**महाराष्ट्र शासन**

क्रमांक.नमाशा १०००/(४९०/२०००)(अ)/माशि-१
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२
दिनांक:- ११ जानेवारी, २००१

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृ. मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर/
औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय:- २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत**

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या ९४ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहिल.

(ब) सदर माध्यमिक शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित नवीन माध्यमिक शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी:-

(१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

(२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

(३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

(४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

(५) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना मान्यता दिली जाईल अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

—२—

Headmistress
M. M. Vidyamandir (Secondary)
Kalewadi (Thergaon), Pune-411017.

याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात [illegible] च सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन, त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरीत पाठविण्यात यावा.

( नं.ग. तडवी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,पुणे/अहमदनगर/सोलापूर/रायगड/ कोल्हापूर/ सातारा/ रत्नागिरी /नाशिक/ठाणे/जळगाव/धुळे/नंदूरबार/औरंगाबाद/जालना/नांदेड/परभणी /बीड/अमरावती/ अकोला/ बुलढाणा/यवतमाळ /वाशिम/ नागपूर/वर्धा/भंडारा/गडचिरोली

३. शिक्षण निरीक्षक,(पश्चिम/उत्तर) बृहन्मुंबई विभाग

४. मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव

५. मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

६. निवडनस्ती माशि-१

Headmistress
M. M. Vidyamandir (Secondary)
Kalewadi (Thergaon), Pune 411017.

<u>विवरणपत्र</u>

शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्र.नमाशा १०००/(४३०/९९)(अ)/माशि-१,
दिनांक:- ११ जानेवारी, २००१ चे सहपत्र.
सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन माध्यमिक शाळांना विना अनुदान तत्वावर
परवानगी दयावयाच्या संस्थांची यादी

| अ.क्र | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | हरीहर शिक्षण संस्था, पेठकर कपाऊंड, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई १०१ | कांदिवली (पूर्व), मुंबई- ०११ | मराठी | आठवी |
| २ | रविकिरण शिक्षण संस्था,विक्रोळी, मुंबई | विक्रोळी पार्कसाईट, विक्रोळी, मुंबई | मराठी | आठवी |
| ३ | शाहू शिक्षण संस्था, पंढरपूर,जि.सोलापूर | प्लॅट नं.२, आ.एस.सी.३४, गोराई, बोरिवली (प), मुंबई-९२ | मराठी | आठवी |
| | **जिल्हा पुणे** | | | |
| ४ | समर्थ विद्या प्रसारक मंडळ, तावरे कॉलनी, पुणे | तावरे कॉलनी, पुणे | मराठी | आठवी |
| ५ | श्री अमृतेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, डोणजे, ता.हवेली, जि.पुणे | डोणजे, ता.हवेली, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ६ | समता पालक शिक्षण संस्था, ५७, समतानगर, येरवडा | समतानगर, येरवडा, पुणे | मराठी | आठवी |
| ७ | मराठवाडा मित्र मंडळ, ३०२/अ, डेक्कन जिमखाना, शिवाजीनगर, पुणे | काळेवाडी, ता.हवेली,जि.पुणे | मराठी | आठवी |
| ८ | ग्रामविकास शिक्षण मंडळ, लोणी, ता.आंबेगाव,जि.पुणे | वडगावपीर, ता.आंबेगाव, जि.पुणे | मराठी | आठवी |
| | **जिल्हा अहमदनगर** | | | |
| ९ | अमृत सांस्कृतिक मंडळ, संगमनेर, जि.अहमदनगर | अमृतनगर, कारखाना परिसर, अमृतनगर, संगमनेर, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| १० | शिवालय सेवाभावी संस्था, गुंजाळवाडी, ता.संगमनगेर, जि.अहमदनगर | गुंजाळवाडी, पो.राजापूर, ता.संगमनेर, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| ११ | भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, मोहा, ता.जामखेड, जि.अहमदनगर | मोहा, ता.जामखेड, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| १२ | सिध्देश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, तेलंगशी, ता.जामखेड, जि.अहमदनगर | तेलंगशी, ता.जामखेड, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| १३ | शनेश्वर देवस्थान ट्रस्ट, शनी शिंगणापूर, ता.नेवासा, जि.अहमदनगर | शनी शिंगणापूर, ता.नेवासा, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| १४ | कोकण एज्युकेशन सोसायटी, मध्यवर्ती कार्यालय, अलिबाग, जि.रायगड | कळंब, ता.कर्जत, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |
| १५ | श्री सिध्देश्वर ग्रामविकास प्रतिष्ठान, शिरापूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर | शिरापूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर | मराठी | आठवी |



Headmistress
M. M. Vidyamandir (Secondary)
Kalewadi (Thergaon), Pune-411017.